# दिनांक १०.०२.२०१५ रोजी झालेल्या ४१ व्या अर्थ समिती मासीक सभेचा कार्यवृत्तांत

## भाग- पहिला

**उपस्थित सदस्य :**

१. मा.श्री.लिंबाजी महिपती पाटील, उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ समिती.
२. मा.श्री.सुरेश गणपतराव मोहिते पाटील, सदस्य.
३. मा.श्री.भाऊसाहेब शामराव पाटील, सदस्य.
४. मा.श्री.तानाजी हरी यमगर, सदस्य.
५. मा.श्री. दत्ताजीराव निळकंठराव पाटील, सदस्य
६. मा.सौ. सुशिला हिंदूराव नांगरे, सदस्या .
७. मा.सौ. कल्पना वसंतराव सावंत, सदस्या.
८. मा.सौ.रुपाली विक्रमसिंह पाटील सदस्या.
९. मा.श्री.दिलीप दत्तू बुरसे, सदस्य

**उपस्थित अधिकारी :**

१) सौ.शुभांगी पाटोळे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा सचिव वित्त समिती,जि.प.सांगली
२) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.),जि.प.सांगली. प्रतिनिधी
३) कार्यकारी अभियंता,(इ.व द) जि.प.सांगली.
४) कार्यकारी अभियंता, (ग्रा.पा.पु.) जि.प.सांगली. प्रतिनिधी
५) कृषि विकास अधिकारी, जि.प.सांगली. प्रतिनिधी
६) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, प्रतिनिधी जि.प.सांगली,.
७) कार्यकारी अभियंता (छोपावि) जि.प. सांगली. प्रतिनिधी
८) जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.सांगली. प्रतिनिधी
९) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला बाल कल्याण) जि.प.सांगली
१०)जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जि.प.सांगली
११) शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प.सांगली.
१२)शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.सांगली. प्रतिनिधी
१३)शिक्षणाधिकारी (निरंतर) जि.प.सांगली.
१४) एन. आर. एच. एम. प्रतिनिधी.
१५) प्रतिनिधी सर्व शिक्षा अभियान.

2

## दिनांक १०/०२/२०१५ रोजी झालेल्या ४१ व्या अर्थ समिती सभेचा कार्यवृत्तांत
### भाग पहिला

आजच्या अर्थ समितीस उपस्थित असलेले मा.उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ समिती व सदस्य, खातेप्रमुख व कर्मचारी यांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी स्वागत करुन मा.उपाध्यक्ष तथा सभापती यांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरुवात करणेत आली.

**विषय क्रमांक** १ - मागील सभा दिनांक १३/०१/२०१५ रोजी घेण्यात आलेल्या वित्त समिती सभेचा अहवाल वाचून कायम करणेत आला.

**विषय क्रमांक २ व ३** - शासनाकडील महत्त्वाचे शासन निर्णय व पत्रांचे वाचन करणेबाबत व माहे डिसेंबर २०१५ चा सर्व खात्यांचा योजनानिहाय व खातेनिहाय अनुदान व खर्चाचा आढावा घेणेबाबत विषय सादर केला असता खातेनिहाय माहिती खालीलप्रमाणे देण्यात आली.

**शिक्षण विभाग :-** विभागाकडील प्राप्त होणारे योजना व अन्य शासन निर्णय मागील बैठकीपासून समिती सभेस अवगत करणेत आले नसल्याचे सांगितले असता यापुढे प्राप्त शासन निर्णय बैठकीस प्राधान्याने सादर करणेत यावेत असे मा.अध्यक्ष यांनी सूचित केले. जि.प.स्विय निधीचा जवळ जवळ ७० टक्के खर्च झालेला आहे. या आठवडयात स्काऊट गाईड शिबीराचे आयोजन दि.१४,१५ व १६ फेब्रुवारी २०१५ रोजी तासगाव येथे करणेत येत असून त्यासाठी दिड लाख रु.तरतूद खर्ची पडत आहे. क्रीडांगणासाठी खर्चाबाबत शिराळा तालुक्याकडून प्रस्ताव प्राप्त झालेनंतर पुढील कार्यवाही करणेत येत आहे. शिष्यवृत्ती परीक्षेसाठी २ लाख ६१ हजार निधीचा लाभ लाभार्थ्यांना देण्यात येत असून क्रीडा पुरस्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार या साठीचा होणारा खर्च झालेला आहे. रु.१ लाख ७५ हजार तरतूद प्राप्त असलेल्या स्वच्छ सुंदर शाळा व ग्रामीण भागातील शाळांना आदर्श शाळा पुरस्कार यामध्ये दि.२३ व २४ फेब्रुवारी २०१५ रोजी कार्यक्रम आयोजन करणेत येत आहेत. जिल्हास्तर विज्ञान प्रदर्शनासाठी माध्यमिक विभागाने खर्च केलेला आहे. उन्हाळी सुट्टीत संस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आलेले आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य** :- जि.प.शाळांना संगणक पुरविणेत आला पण काही ठिकाणी इ-लायब्ररीसाठी आवश्यक सॉफटवेअर पुरविणेत आलेले नाहीत. तर काही ठिकाणी लोकवर्गणीतून शाळांना संगणक दिलेले असून त्यासाठी अभ्यासक्रम नियोजन पुरविणे आवश्यक आहे. सदर विषयाबाबत प्राप्त मागणी व अनुषंगिक कार्यवाहीचा अहवाल गटशिक्षणाधिकारी यांचेकडून प्राप्त करवून घेऊन सदर माहिती सभेस अवगत करणेत यावी. शिक्षण विभागाकडील जो निधी अदयापि अखर्चित राहिला आहे तो जि.प.शाळांना संगणक प्रयोगशाळा व सॉफटवेअर पुरविणेकामी वापरणेत यावा असे सर्वानुमते ठरविण्यात आले. करिता गटशिक्षणाधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त करवून घेवून कार्यवाही करावी. तसेच जि.प.सदस्यांनीही मतदारसंघनिहाय अशा शाळा सुचवाव्यात.

**शिक्षणाधिकारी :-** सर्वप्रथम जि.प.मंजुर असलेल्या ३२ जि.प.शाळेसाठी संगणक सुविधा व सॉफटवेअर पुरविणेची कार्यवाही करणेत येत आहे तदनंतर उर्वरित शाळांना लाभ देणेबाबत विचार करणेत येत आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य** :-ज्या जि.प.शाळा खोल्या भाडयाने देण्यात आलेल्या आहेत त्याचे फेरमुल्यांकन करुन रिॲलिस्टिक भाडे ठरविण्यात यावे व त्यानुसार कार्यवाही करावी. सदर भाडेवाढबाबतची सद्यस्थिती सभेस अवगत करावी.

अर्थ समिती ही एक महत्त्वाची सभा असलेने सदर बैठक सुरु असताना उपस्थित होणाऱ्या बाबींवर सभेस तात्काळ माहिती प्राप्त होणे गरजेचे असलेने सदर दिवशी खातेप्रमुखांनी कर्मचाऱ्यांना रजा मंजुर करु नये.

**बांधकाम विभाग :-** जि.प. स्वीय निधीचा ४३ टक्के खर्च झालेला आहे. या महिनाअखेर उर्वरित कामे सुरु होतील. डी.पी.डी.सी.अंतर्गत यावर्षी ८२ कामे मंजूर होती त्यातील ३ कामे सोडून सर्व कामे प्रगतीपथावर आहेत. कवठेमहांकाळ कामाचे रिटेंडर झाले आहे.

**मा.श्री.दत्ताजी पाटील, सदस्य :-** आगळगाव, थबडेवाडी तसेच जत तालुक्यातील १ व कवठेमहांकाळ तालुक्यातील ३ कामे प्रलंबित आहेत सदर कामाची यादी सभेस अवगत करावी. कामे पूर्ण होणेबाबत सत्त्वर कार्यवाही करणेत यावी.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य** :-व्यापारी तत्त्वावर संकुल विकसीत करणे बाबत निधी खर्ची पडला आहे का?

**बांधकाम विभाग :-** प्राप्त ८६ लाख निधीपैकी २५ लाख खर्ची पडला असून उर्वरित खर्चा बाबत कार्यवाही सुरु आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य** :- कवठेमहांकाळ, विटा तालुक्यातून प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन जि.प.उत्पन्न वाढविणेच्या दृष्टीने प्रामुख्याने कार्यालये, नाटयगृहे बांधणेबाबत विचार व्हावा.

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी :-** या वर्षी माहे डिसेंबरअखेर शाळाखोल्या भाडयापोटी र.रु.५ लाख ६९ हजार जमा झालेली आहे. शिक्षण विभागाने याबाबत खात्री करावी.

**पशुसंवर्धन विभाग :-** जि.प.स्वीय निधीमध्ये ५३ लाख तरतूद होती. पैकी ५१ लाख ६३ हजार म्हणजेच ९० टक्के खर्च झालेला असून उर्वरित खर्च या महिनाअखेर होत आहे. घोडाखरेदीबाबत आर.सी.झालेनंतर खर्च होत आहे. कामधेनू औषध खरेदीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयास तांत्रिक मान्यतेसाठी पाठपुरावा करणेत येत असून आठ दिवसात मान्यता मिळण्याची शक्यता आहे. तदनंतर आदेश निर्गमित करणेत येत आहेत.

**छोटे पाटबंधारे विभाग :-** प्राप्त जि.प.स्वीय निधीचा ५६ टक्के खर्च झालेला आहे. केटीवेअरबाबत स्थानिक स्तरावर कामे सुरु आहेत. नाविण्यपूर्ण योजना गाळ काढणे, पाझर तलाव, नवीन बंधारे दुरुस्ती इत्यादी बाबींची सविस्तर माहिती सादर करणेत आली.

**मा.श्री.तानाजी यमगर,सदस्य :-** बोरगाव ता.कवठेमहांकाळ बंधारा फुटला आहे व काम अपूर्ण आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य** :- मत्स्य संवर्धनासाठी असणारे तलाव व त्यापासून जि.प.उत्पन्नवाढीसाठी झालेले प्रयत्न याबाबत अहवाल सादर करावा. ज्या तालुक्यांकडून सदर योजनेबाबत प्रतिसाद मिळाला नाही अशा ठिकाणांची यादी सभेस देऊन याबाबत पाठपुरावा करणेत यावा.

**आरोग्य विभाग :-** खात्याकडील मंजुर अनुदान व प्रत्यक्ष खर्च याबाबत सविस्तर योजनानिहाय माहिती दिली.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य** :- एन.आर.एच.एम.कडील योजनेचा सविस्तर अहवाल दयावा.

**कृषि विभाग :-** चापकटर पुरवठा, ताडपत्र्या पुरवठा, इलेक्ट्रीक मोटर्स पुरवठा तालुकास्तरावर झालेला आहे. जि.प.स्वीय निधीचा खर्च जवळजवळ झालेला आहे. सौर अभ्यासिका, वैरण विकास व रोपवाटीका या बाबतचा खर्च या महिनाअखेरीस पूर्ण होत आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य :-** नाविण्यपूर्ण योजनांबाबतची वस्तुस्थिती काय? सौर अभ्यासिकेची आरसी ४ दिवसांत प्राप्त होत असल्याचे खात्याने सांगितले असता त्याचा लाभ ग्रामपंचायतीऐवजी जि.प.शाळांना प्राधान्याने मिळेल यादृष्टिने प्रयत्न करावेत.

**मा.श्री.लिंबाजी पाटील तथा सभापती :-** ताडपत्र्या हया निकृष्ट दर्जाच्या न देता प्लॅस्टीकच्या ताडपत्री पुरवठा करावा.

**कृषि विभाग :-** पुढील वर्षी त्याप्रमाणे खरेदी करणेबाबत प्रयत्न करणेत येतील.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य :-** वैरण विकास व आपत्कालीन योजनेचा खर्च झालेला नाही.

**कृषि विभाग :-** सदर योजनेखालील बीले प्राप्त झाली असून अनुषंगिक कार्यवाही सत्त्वर करणेत येत आहे. रोपवाटीकेसाठी ३ लाख तरतूद असून रोपवाटीकेच्या कुंपनाचे इस्टिमेट करुन कूंपन घालणे तसेच एमएसइबी कनेक्शन घेणे पाण्याचा सुविधेचा अभाव आहे या बाबीवर पाठपुरावा सुरु आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य :-** जि.प.उत्पन्न वाढीच्या दृष्टीने रोपवाटीकेसाठी प्रयत्न व्हावेत. तसेच वैरणविकास योजना पशुसंवर्धनकडे कन्व्हर्जन करणेबाबत कार्यवाही करावी जि.प.उत्पन्न वाढीबाबत निर्णय घेण्याचे या सभेस अधिकार असलेने औषध दुकानदार व अन्य परवाने मंजुर करणे तसेच थकीत रक्कम वसुलीबाबत जिल्हा परिषद सभेत ठराव घेणेत यावा व वसुलीबाबत तद् अनुषंगिक कार्यवाही करावी.

**कृषि विभाग :-** नियमानुसार सर्वानुमते कार्यवाही करणेत येत आहे.

**समाजकल्याण विभाग :-** वसंत घरकुल योजना खर्च १०० टक्के होणेचे दृष्टीने प्रयत्न करणेत आलेले आहेत. ग्रामीण भागातील मागासवर्गीय लाभार्थ्यांना साहित्य पुरविणे अंतर्गत ३५ लाखाचे साहित्य पुरविणेबाबत फॉर्म वाटप केलेले असूनही अदयापि लाभार्थ्यांकडून मागणी पुरेशा प्रमाणात आलेली नाही. याबाबत पाठपुरावा सुरु आहे.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य :-** प्रचार व प्रसिद्धी अंतर्गत जिल्हा परिषद सदस्यांच्या मतदार संघातील मागील तीन वर्षात ज्या योजना राबविल्या गेल्या त्या योजनांचे, झालेल्या कामांचे मतदारसंघनिहाय बुकलेट तयार करणेबाबत यापूर्वी चर्चा करणेत आलेली आहे. त्यादृष्टीने ग्रामपंचायत विभागाने सदरील माहितीचे खातेनिहाय संकलन करुन वितरण तसेच अनुषंगिक कार्यवाही करणेबाबतची जबाबदारी देणेचे सर्वानुमते ठरले.

**महिला व बालकल्याण विभाग :-** स्वीय निधी योजनानिहाय खर्च, लाभार्थी निवड, सायकल खरेदी योजना, शिलाई मशीन खरेदीबाबत माहिती दिली.

अंगणवाडी लाभार्थ्यांना लाभ देणेसाठी प्रस्ताव प्राप्त झालेनंतर कार्यवाही करणेत येत आहे. नवीन अंगणवाडया सुरु करणेसाठी निकष स्पष्ट करणेत आले. मिनी अंगणवाडयांचे १० प्रस्ताव प्राप्त असून सर्व प्रस्ताव मंजुर केले आहेत.

**मा.श्री.सुरेश मोहिते, सदस्य :-** म.बा.क.कडील योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या पुरवठा आदेशांबाबतची सविस्तर माहिती वेळोवेळी सदस्यांना अवगत करणे आवश्यक आहे जेणेकरुन पुरवठा झालेनंतर लाभार्थ्यांच्या तक्रारी उद्‌भवणार नाहीत. विशेष घटक योजनेतील जे लाभार्थी वंचित राहतील त्यांचा पुढील वर्षी विचार करणेत यावा.

**विषय क्रमांक ४ :-** सांगली जिल्हा परिषदेचा माहे डिसेंबर २०१४ या मासिक लेख्याला अर्थ समितीची शिफारस घेऊन सदरचा विषय मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे पाठविणेचे ठरले.

**विषय क्रमांक ५ :-** वित्त विभागाकडील लेखा विषयक नोंदवहया माहे ऑक्टोबर २०१४ ते डिसेंबर २०१४ अखेर पूर्ण असल्याने त्यास मान्यता देणेचे ठरले.

**विषय क्रमांक ६ :-** सांगली जिल्हा परिषद स्विय निधी सन २०१४-२०१५ चे अंतिम सुधारित व सन २०१५-१६ चे मूळ अंदाजपत्रकास जि.प.सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेस अर्थ समितीची शिफारस घेणेबाबत चर्चा करणेत येऊन दुरुस्तीसह शिफारस करणेचे ठरले.

**यानंतर मा.सभापती यांचे परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयावरती ठराव करणेत आले.**

**विषय क्रं. ७ :** सन्मानीय स्थायी समिती जि.प.सांगली सदस्य यांचे माहे जूलै २०१४ ते माहे फेब्रुवारी २०१५ अखेर प्रवासभत्ता देयके ३ महीन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने म.जि.प.व.पं.स (पदाधिकारी सदस्य व प्र.भ व दै.भत्ता)नियम १९६९ मधील नियम ७(४) नुसार वित्त समितीची मान्यता देणेत आली.

यानंतर जि.प.सदस्य मा.श्री. सुरेश गणपतराव मोहिते-पाटील यांची कॉंग्रेसच्या पक्षप्रतोद पदी निवड झालेबद्दल मा.उपाध्यक्ष यांनी अर्थ समितीच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले.

यानंतर मा.उपाध्यक्ष तथा सभापती वित्त समिती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडलेबद्दल सर्वांचे पुनःश्च एकदा आभार मानून सभा संपलेचे जाहिर केले.

सौ.शुभांगी पाटोळे
मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा
सचिव अर्थ समिती जिल्हा परिषद सांगली.

मा.श्री.लिंबाजी महीपती पाटील
सभापती अर्थ समिती
जिल्हा परिषद सांगली.

## भाग दुसरा

## दि.२०.०२.२०१५ रोजी झालेल्या ४१ व्या अर्थ समितीच्या मासिक सभेचा कार्यवृत्तांत

**विषय क्र.१** :- दि.१३.०१.२०१५ रोजी घेणेत आलेल्या वित्त समिती सभेचा अहवाल वाचून कायम करणे.
**ठराव क्र. २८४ :** दि. १३.०१.२०१५ रोजी घेणेत आलेल्या वित्त समिती सभेचा अहवाल वाचून कायम करणेत आला. ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक : मा.श्री. भाऊसाहेब शामराव पाटील, सदस्य.
अनुमोदक : मा.सौ. कल्पना वसंतराव सावंत, सदस्या.

**विषय क्र.२** :- शासना कडील महत्वाचे शासननिर्णय व पत्राचे वाचन करणे.
**ठराव क्र.२८५:-** शासना कडील महत्वाचे शासननिर्णय व पत्राचे वाचन करणेत आले. ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक : श्री. तानाजी हरी यमगर, सदस्य.
अनुमोदक : मा.सौ.रुपाली विक्रमसिंह पाटील, सदस्या.

**विषय क्र.३:** माहे जानेवारी २०१५ च्या सर्व खात्यांचा योजनानिहाय खातेनिहाय अनुदान व खर्चाचा आढावा घेणे.
**ठराव क्र.२८६:** माहे जानेवारी २०१५ चा सर्व खात्यांचा योजनानिहाय खातेनिहाय अनुदान व खर्चाचा आढावा घेणेत आला. ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक:मा.श्री.दत्ताजीराव निळकंठराव पाटील, सदस्य.
अनुमोदक मा.श्री सुरेश गणपतराव मोहितेपाटील, सदस्य.

**विषय क्रं.४:** सांगली जिल्हा परिषदेचा माहे डिसेंबर २०१४ च्या मासिक लेख्याला अर्थ समितीची शिफारस घेवून सदरचा विषय मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे पाठविणेबाबत चर्चा करणे.
**ठराव क्र.२८७:** सांगली जिल्हा परिषदेचा माहे डिसेंबर २०१४ च्या मासिक लेख्याला अर्थ समितीची शिफारस घेवून सदरचा विषय मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे पाठविणेबाबत ठराव सर्वानुमते मंजूर करणेत आला.

सुचक:मा.सौ.सुशिला हिंदूराव नांगरे, सदस्या
अनुमोदक मा.श्री.दिलीप दत्तु बुरसे सदस्य.

**विषय क्रं.५:** वित्त विभागाकडील लेखा विषयक नोंदवहया माहे ऑक्टोंबर २०१४ ते डिसेंबर २०१४ अखेर पूर्ण असल्याने त्यास मान्यता देणे बाबत विचार करणे.

**ठराव क्र.२८८:** वित्त विभागाकडील लेखा विषयक नोंदवहया माहे ऑक्टोंबर २०१४ ते डिसेंबर २०१४ अखेर पूर्ण असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे. ठराव सर्वानुमते मंजूर करणेत आला.

सुचक:मा.श्री.दत्ताजीराव निळकंठराव पाटील, सदस्य.
अनुमोदक मा.श्री.दिलीप दत्तु बुरसे सदस्य.

**विषय क्रं.६:** सांगली जिल्हा परिषद स्विय निधी सन २०१४-२०१५ चे अंतिम सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रकास जि.प.सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेस अर्थ समितीची शिफारस घेणेबाबत चर्चा करणे.

**ठराव क्रं.२८९:** सांगली जिल्हा परिषद स्विय निधी सन २०१४-२०१५ चे अंतिम सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रकास दुरुस्ती सह जि.प.सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेस अर्थ समितीची शिफारस करणेत आली.ठराव सर्वानुमते मंजूर करणेत आला.

सुचक:मा.श्री.तानाजी हरी यमगर, सदस्य.
अनुमोदक मा.श्री सुरेश गणपतराव मोहितेपाटील, सदस्य.

**यानंतर मा.सभापती यांचे परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयावरती ठराव करणेत आले.**

**विषय क्रं. ७ :** सन्मानीय स्थायी समिती जि.प.सांगली सदस्य यांचे माहे जूलै २०१४ ते माहे फेब्रुवारी २०१५ अखेर प्रवासभत्ता देयके ३ महीन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने म.जि.प.व.पं.स (पदाधिकारी सदस्य व प्र.भ व दै.भत्ता)नियम १९६९ मधील नियम ७(४) नुसार वित्त समितीची मान्यता देणेबाबत विचार करणे.

**ठराव क्रं. २९०:** सन्मानीय पशुसंवर्धन समिती सदस्य यांचे माहे जूलै २०१४ ते माहे फेब्रुवारी २०१५ प्रवासभत्ता देयके ३ महीन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने म.जि.प.व.पं.स (पदाधिकारी सदस्य व प्र.भ व दै.भत्ता)नियम १९६९ मधील नियम ७(४) नुसार वित्त समितीची मान्यता देणेत आली. ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक : भाऊसाहेब शामराव पाटील, सदस्य.
अनुमोदक :मा.सौ.रुपाली विक्रमसिंह पाटील, सदस्या.

यानंतर मा. उपाध्यक्ष तथा सभापती वित्त समिती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पारपाडले बददल सर्वांचे पुन:श्च एकदा आभार मानुन सभा संपलेचे जाहिर केले.

सौ.शुभांगी पाटील
मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा
सचिव अर्थ समिती जिल्हा परिषद सांगली.

मा.श्री.लिंबाजी महीपती पाटील
सभापती अर्थ समिती
जिल्हा परिषद सांगली.